**साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास श्री.पी.एस.सुर्यवंशी यांच्याद्वारे शपथेवर सुरुः—**

मी या केसच्या कामी आरोपीने मला दिलेले चेक दाखल केलेला आहे. आता मला नि.क्र.३३ सोबत असणारा आरोपी मला दिलेला चेक दाखवला, तो तोच आहे, तो चेक उदगीर अर्बक को.ऑप.बँक येथे रु.३,५०,०००/— देण्यासाठी मला दिलेला होता, त्यावर आरोपीची सही आहे, त्याला **नि.क्र.३४** देण्यात येतो. तो चेक वटण्यासाठी मी माझ्या आय.सी.आय.सी.आय. या बँक खात्यावर लावला. तो चेक दि.१३/०७/२०२१ रोजी मला परत मिळाला. बँकेने मला चेक परताव्याचा मेमो दिला. मला आता मेमो दाखवला, तो तोच आहे, त्याला **नि.क्र.३५** देण्यात आला. खात्यावर पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याचे मेमोवरून सिध्द झाले. मी त्याची भेट घेऊन चेक न वटल्याबद्दल त्याला सांगितले. त्याने मला उडवाउडवीची उत्तरे दिली व धमकी पण दिली. मी त्यानंतर माझ्या वकिलांमार्फत त्याला दि.१९/०७/२०२१ रोजी नोटीस पाठवली. आता मला नोटीसची स्थळप्रत दाखवली, ती तीच आहे, त्यावरी माझी व माझ्या वकिलाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्याला **नि.क्र.३६** देण्यात येतो.

मी आरोपीला पोस्टाद्वारे नोटीस पाठवली, त्याबाबत मी पोस्टाची पावती दाखल केली आहे, आता मला ती पावती दाखवली, ती तीच आहे, तिला **नि.क्र.३७** देण्यात येतो. आरोपीला पाठवलेले नोटीस मिळाल्याबाबत

मी पोस्टाची पोचपावती दाखल केली आहे. मला ती पोचपावती दाखवली, ती तीच आहे, त्यास **नि.क्र.३८** देण्यात येतो. माझी नोटीस मिळून सुध्दा आरोपी पैसे परत न केल्याबद्दल माझी त्याच्या विरुद्ध तक्रार आहे.

**साक्षीदार यांचा उलटतपास आरोपीतर्फे श्री.एस.बी.पाटील, विधिज्ञ यांना पुकारले असता गैरहजर. आरोपीपाशी विचारणा केली असता तो सुद्धा उलटतपास घेण्यास विचारणा केली असता त्याने सुद्ध नकार दिला. सबब, उलटतपास नाही.–**

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.09.20 18:07:12 +0530

**दिनांक – २०/०९/२०२५**

**न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**(न्यायालय क्रं. १), उदगीर.**